# नियमित दिवाणी दावा क्र.२७६/२०२१ मधील नि.८४ खालील आदेश

प्रतिवादी क्र.१८ यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांचेविरुध्द झालेला एकतर्फा हुकुम रद्द होऊन मिळणेसाठी केलेला आहे.

(२) वादी यांनी सदरचा दावा हा प्रतिवादींविरुध्द वाटपाकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जान्वये प्रतिवादी क्र.१८ यांनी असे कथन केले आहे की, ते व्यवसायानिमित्त परठिकाणी राहणेस असलेने न्यायालयात वेळेत हजर राहता आले नाही तसेच वकीलांना भेटून दाव्याची आवश्यक माहिती देता आली नाही. त्यामुळे दाव्याचे कामी कैफियत दाखल करणेस विलंब झाला आहे. प्रतिवादी यांनी जाणूनबुजून कैफियत दाखल करणेस विलंब केला नाही. तरी प्रतिवादी क्र.१८ विरुध्द झालेला एकतर्फा हुकुम रद्द करणेचा आदेश व्हावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

(३) वादीतर्फे विद्वान विधीज्ञांनी प्रस्तुत अर्जावरच म्हणणे सादर करुन असे कथन केले आहे की, सदरील प्र.वादी ने केलेला अर्ज व त्यामधील मजकूर मान्य व कबूल नाही. एक वर्षापेक्षा जास्त विलंब झालेला असल्यामुळे जास्तीत जास्त कॉस्ट करावी. अशी विनंती वादीतर्फे केलेली आहे.

(४) नि.८४ वरील अर्ज, त्यापुष्ट्यर्थ दाखल केलेले प्रतिज्ञापत्र व नि.१८ चे अर्जावरील म्हणणे यांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी तर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादीला दाव्याचे कामी दि.२९.११.२०२१ रोजी समन्सची बजावणी होऊनदेखील ते वेळेत कैफियत दाखल करु शकलेले नाहीत. प्रतिवादी यांनी कथन केले की, ते व्यवसायानिमित्त परठिकाणी राहणेस असलेने न्यायालयात वेळेत हजर राहता आले नाही तसेच वकीलांना भेटून दाव्याची आवश्यक माहिती देता आली नाही. सबब कारण लक्षात घेता प्रतिवादी हे प्रस्तुत प्रकरणात हजर झाल्याने दाव्याचे कामकाज पुढे चालून दावा

गुणदोषावर निकाली होण्यास मदत होणार आहे. प्रस्तुत दावा हा वाटपाकरीता असलेने दावा मिळकतीबाबतचे सर्व हिस्सेदार दाव्याचे कामी आवश्कय आहेत त्यामुळे तसेच दाव्याचे स्वरुप विचारात घेता व प्रतिवादीने केलेला विलंब विचारात घेता तसेच वेगवेगळया दाव्यांना पक्षकारांना सामोरे जावे लागू नये व न्यायाच्या दृष्टीकोणातून झालेल्या उशीराबाबत वादीस नुकसान भरपाई देण्याच्या तत्वावर सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित वाटते. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

प्रतिवादी क्र.१८ यांचा निशाणी ८४ वरील अर्ज र.रु.३००/-इतका खर्च वादींना देणेचे अटीवर मंजूर करण्यात येतो.

Digitally signed by SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Date: 2025.01.30 11:51:16 +0530

विटा.
दि. २९.०१.२०२५

(श्रीमती अ. ब. सोनटक्के)
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
विटा, जि.सांगली.